**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक १३ सप्टेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. सौर कृषिपंपाच्या यंत्रणेतून निर्माण झालेली अतिरिक्त वीज विकून शेतकऱ्याला उत्पन्न मिळण्यासाठी योजना लागू करण्यात येईल- ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती.
2. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर.
3. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी ज्येष्ठ नागरिकांना दिलं जाणार नवीन कार्ड, लवकरच सुरू होणार नोंदणी प्रक्रिया.
4. उद्या साजऱ्या होणाऱ्या हिंदी दिनानिमित्त ठिकठिकाणी हिंदी भाषा पंधरवाड्याचं आयोजन.

****

**देवेंद्र फडणवीस**

कृषिपंपाच्या वीज कनेक्शनसाठी शेतकऱ्यांनी अनेक वर्षे वाट पाहण्यापासून मागणीनुसार तत्काळ कृषिपंप अशी राज्याची वाटचाल 'मागेल त्याला सौर कृषिपंप योजने'मुळे झाली आहे. आगामी काळात सौर कृषिपंपाच्या यंत्रणेतून निर्माण झालेली अतिरिक्त वीज विकून शेतकऱ्याला उत्पन्न मिळण्यासाठी योजना लागू करण्यात येईल, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केलं. "मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेत लाभार्थी शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी महावितरणने तयार केलेल्या वेबसाईटचे उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते आज मुंबईत झालं, त्यावेळी ते बोलत होते. योजनेची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचं आणि पोस्टरचं प्रकाशनही त्यांनी केलं.

****

**भाजप आंदोलन**

काँग्रेस नेते तथा लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संविधानाबाबत केलेल्या वक्तव्याविरोधात भरतीय जनता पक्षातर्फे आज राज्यव्यापी आंदोलन करण्यात येत आहे. अकोल्यात भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आलं. अमेरिकेत जाऊन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारतातील आरक्षण संपवण्याबाबत केलेल्या वक्तव्याचा तीव्र निषेध नोंदविण्यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या

वतीने राहुल गांधी यांच्या विरुद्ध राज्यभर निषेध आंदोलन करण्यात येईल, अशी घोषणा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज केली. सामाजिक दृष्ट्या भारतात सामंजस्य निर्माण झाल्यानंतर सामाजिक आरक्षण संपवण्याचा निर्णय काँग्रेस घेईल असं काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेलं वक्तव्य निषेधार्ह आहे असं ते म्हणाले. दरम्यान, राहुल गांधीं विषयी भाजपच्या आमदारांनी केलेल्या कथित हिंसक वक्तव्याचा आम्ही निषेध करतो असं सांगत काँग्रेसचे नागपूर शहराध्यक्ष विकास ठाकरे यांच्या नेतृत्वात आज व्हेरायटी चौकात आंदोलन करण्यात आलं.

****

**गोपालदास अग्रवाल**

2019 मध्ये काँग्रेस पक्षातून भाजपामध्ये प्रवेश घेणारे गोंदियाचे आमदार गोपालदास अग्रवाल यांनी, आज पुन्हा काँग्रेसमध्ये परतण्याचा निर्णय घेत पक्षप्रवेश केला. आपल्या क्षेत्राच्या विकासासाठी निधी न मिळाल्यामुळे हा निर्णय घेतल्याचं त्यांनी म्हटलं आहे. आज गोंदिया मध्ये काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांच्या उपस्थितीत अग्रवाल यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

****

**भेसळयुक्त मिठाई**

सणासुदीच्या काळात भेसळयुक्त मिठाई, मसालेदार आणि दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मिती मोठ्या प्रमाणावर होतात. याला आळा घालण्याचे आणि विक्रीवर कडक नजर ठेवण्याचे निर्देश FSSAI, अर्थात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी वारंवार अंमलबजावणी आणि पाळत ठेवण्याची मोहीम राबवावी, अशा सुचनाही प्राधिकरणानं दिल्या आहेत. तसंच याला आळा घालण्यासाठी फिरती पथकं तयार करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

****

**अतुल लोंढे**

महायुती सरकारने आनंदाचा शिधा या योजनेमध्ये काही मर्जीच्या कंत्राटदारांना कंत्राट देऊन अतिशय निकृष्ट दर्जाचे धान्य आणि खाद्य सामग्री लाडक्या बहिणींना देण्याचा घाट घालून, आनंदाचा शिधा नव्हे तर आनंदाचा मलिदा लाटण्याचा प्रकार केला असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी आज पत्रकार परिषदेत केला. गौरी गणपती आणि इतर उत्सवानंतर हा निकृष्ट दर्जाचा 'आनंदाचा' शिधा देण्याचं काय प्रयोजन आहे? असा सवाल देखील त्यांनी

उपस्थित केला. ज्या कंपनीला हे कंत्राट दिले होते त्या कंपनीने रवा साखर तसेच तेलामध्ये भेसळ केल्याचा आरोप त्यांनी या पत्रकार परिषदेत खाद्य सामग्री दाखवून केला.

****

## वंदे भारत

मध्य आणि दक्षिण भारतातील प्रमुख संपर्कासाठी वंदे भारत एक्स्प्रेस सेवा १५ सप्टेंबरपासून प्रवाशांच्या सेवेत येत आहे. ही अत्याधुनिक रेल्वेगाडी नागपूर ते सिकंदराबाद दरम्यान धावेल. नागपूर ते सिकंदराबाद, वंदेभारत एक्स्प्रेस पाच प्रमुख स्थानकांवर थांबेल, ज्यात चंद्रपूर जिल्हा समाविष्ट असून, चंद्रपूर आणि बल्लारपूर स्थानकावरून प्रवाशांना विशेष सुविधा मिळतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृष्यं प्रणाली मार्फत नागपूर ते सिकंदराबादसह, भुज-अहमदाबाद , कोल्हापूर-पूणे, आग्रा कँन्ट -बनारस, रायपूर-विशाखापट्टणम आणि पुणे -हुबळी या गाड्यांना हिरवी झेंडी दाखवतील. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मध्य रेल्वेचे महाव्यवस्थपक धर्मवीर मीणा उपस्थित असतील. मंगळवार वगळता उर्वरित ६ दिवस नागपूर -सिकंदराबाद वंदे भारत गाडी चालवण्यात येईल.

****

## अरविंद केजरीवाल

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी केंद्रीय गुन्हे अन्वेषण सीबीआयनं दाखल केलेल्या गुन्ह्यात सर्वोच्च न्यायालयानं आज जामीन मंजूर केला आहे. दहा लाख रुपयांच्या सशर्त जातमुचलक्यावर हा जामीन मंजूर झाला आहे. दरम्यान, केजरीवाल यांना मिळालेल्या जामीनातून देशात लोकशाहीचा पाया आजही भक्कम असल्याची बाब स्पष्ट झाली असल्याची भावना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी समाजमाध्यमांवर व्यक्त केली आहे.

****

## प्रधानमंत्री जन आरोग्य

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र असणाऱ्या सर्व जेष्ठ नागरिकांना एक नवीन विशेष कार्ड दिलं जाणार आहे. आधार कार्डावरच्या जन्मतारखेनुसार ७० वर्ष आणि त्याहून अधिक वयाचे नागरिक या योजनेत अर्ज दाखल करण्यास पात्र असतील. ही योजना एका आठवड्यात सुरु होईल अशी अपेक्षा असून यासाठी पात्र व्यक्तींनी वेबसाइटवर अर्ज भरणं आवश्यक आहे. पोर्टलवर फेस ऑथेंटिकेशनची सुविधा उपलब्ध असून ७० वर्षांवरच्या नागरिकांसाठी विशिष्ट लिंक उपलब्ध आहे. खाजगी विमाधारक आणि कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे लाभार्थी

देखील या योजनेचा लाभ घेऊ शकतील अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. मंत्रिमंडळानं याच आठवड्यात आयुष्मान भारत योजने अंतर्गत मिळकतीच्या कोणत्याही सीमेशिवाय जेष्ठ नागरिकांच्या या योजनेला मंजुरी दिली आहे.

****

## कार्यशाळा

विजांच्या दुर्घटनांमुळे शेतकरी, आणि पशुधनाचे मृत्यू टाळण्यासाठी व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. विजांच्या दुर्घटनांपासून बचाव होण्यासाठी मेघदूत, दामिनी-लाईटनिंग, अलर्ट, मौसम आणि सचेत यासारख्या मोबाईल ॲपचा आणि अधिकृत संकेतस्थळांच्या वापराबाबत शेतकरी बांधवांना माहिती करुन द्यावी, अशा सूचना वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांनी अमरावती जिल्ह्यातील मोर्शी इथल्या कार्यशाळेत दिल्या. 'मोबाईलव्दारे हवामानाची माहिती शेतकऱ्यांच्या दारी' या विषयाची कार्यशाळा मोर्शीच्या लाहोटी विज्ञान महाविद्यालयात नुकतीच पार पडली. मोर्शी परिसरातील शेतकरी, महाविद्यालयीन विद्यार्थी- विद्यार्थींनी तसेच कृषी क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

****

## अटल भूजल बक्षिस

बुलडाणा जिल्ह्यात जलसंधारणाच्या उकृष्ट कामगिरीबद्दल मोताळा तालुक्यातल्या शेलगाव ग्रामपंचायतीला राज्य शासनाचा अटल भूजल योजनेंतर्गत सुरु असलेल्या भूजल ग्रामसमृद्ध स्पर्धेत बक्षिस मिळालं आहे. काल नाशिक इथं झालेल्या कार्यक्रमात राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते शेलगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी हे बक्षिस स्वीकारलं.

****

## गणेश उत्सव विशेष

जटपुरा गेट हे चंद्रपूर शहरातील ऐतिहासिक प्रवेश द्वार १६ व्या शतकातील गोंड राजवंशाच्या काळाची साक्ष देतं. या जटपुरा गेट'ची हुबेहुब कलाकृती युवा चित्रकार अंकिता नवघरे या तरुणीने गणपती देखाव्यात साकारली आहे. स्क्रू पेंटिंग, कॅनव्हास पेंटिंग, रेझिन आर्ट सारख्या कामात अंकिताचा हातखंडा आहे. तिच्या या कलेची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड या संस्थेने देखील घेतली आहे. जटपुरा दरवाजा गोंड राजवटीत संरक्षणात्मक संरचना म्हणून उभारला गेला होता. जटपुरा गेट'चा वापर किल्ल्याच्या मुख्य प्रवेश्वर द्वारा प्रमाणे केला जात असे.

****

## पुस्तक विमोचन

**लेखक धनंजय सोइंदाजी लिखित**, Humanising Power- Ambedkar's Humanist Approach to power and politics **या पुस्तकाचं विमोचन आणि 'आंबेडकरांचा सत्ता आणि राजकारणाप्रती मानवतावादी दृष्टिकोन' या विषयावर चर्चा, नागपूरच्या कामठी रोड इथल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्वेंशन सेंटर इथं रविवार दिनांक १५ सप्टेंबर रोजी आयोजिण्यात आली आहे. यावेळी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे समाजशास्त्र विभागाचे प्राध्यापक विवेक कुमार आणि अमेरिकेच्या मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक जॉन क्यून चर्चेत सहभागी होतील.**

****

## ज्युनियर ॲथलेटिक्स

**दक्षिण आशियाई ज्युनियर ॲथलेटिक्स स्पर्धेच्या कालच्या दुसऱ्या दिवशी भारताने नऊ सुवर्णपदकांची कमाई केली. महिलांच्या थाळीफेक प्रकारात अनिशा हिने ४९ मीटर ९१ सेंटीमीटरचं विक्रमी अंतर गाठत भारताला पहिलं सुवर्णपदक मिळवून दिलं. याच स्पर्धेत अमानत कंबोज हिने ४८ मीटर ३८ सेंटीमीटर अंतरावर थाळीफेक करत रौप्यपदक जिंकलं. महिलांच्या ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत नीरू पहतक हिने ५४.५० सेकंदांची वेळ नोंदवून सुवर्णपदक तर ५४.८२ सेकंदांसह सँड्रा मोल साबू हिनं रौप्यपदक जिंकलं. पुरुषांच्या ११० मीटर अडथळा शर्यतीत नयन प्रदीप सरडे यानं १४.१४ सेकंदाची वेळ नोंदवत रौप्य पदकाची कमाई केली.**

****

## हिंदी दिवस

**उद्या १४ सप्टेंबर-भारतासह जगभरात हा दिन हिंदी दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. हिंदी भाषेच्या प्रचलन आणि प्रसाराला प्रोत्साहन देण्यासाठी हिंदी भाषा पंधरवाड्याचं देखील आयोजन ठिकठिकाणी केलं जात. शासकीय आणि केंद्रीय आस्थापनांमध्ये हिंदी भाषेतून कामकाजाला प्रोत्साहन दिलं जातं. यानिमित्त हिंदी भाषेतून निबंध, वक्तृत्व, टंकलेखन आदी स्पर्धांचं आयोजन देखील केलं जातं . संपूर्ण भारताला जोडणारी, एकता टिकवणारी आणि इंग्रजी भाषेला पर्याय म्हणून हिंदी भाषेचा वापर आणि प्रसार वाढावा हा या दिनाचा उद्देश आहे. आकाशवाणीच्या हिंदी बातमी पत्रांनी देशभरात हिंदी भाषेच्या प्रसार आणि प्रचारात महत्त्वपूर्ण योगदान दिलं आहे.**

****

## हवामान

नागपुर जिल्ह्यात आज अनेक ठिकाणी दुपारपासून हलका ते माध्यम स्वरूपाचा पाऊस पडत आहे. हवामान विभागानं येत्या काही तासांत भंडारा, नागपूर, वर्धा, अमरावती, गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. मागील चार-पाच दिवस गडचिरोली जिल्ह्यात भामरागड गावात पुराचे पाणी शिरल्याने अनेक नागरिकांची घरे आणि शेतीचे नुकसान झाले. राज्याचे अन्न आणि औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी आज भामरागडला भेट देऊन पाहणी केली. आत्राम यांनी आपद्ग्रस्त नागरिकांशी चर्चा करुन अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नागरिकांना भरपाई देण्याचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश आत्राम यांनी यावेळी दिले.

*****